ePaper

**शिंदे गट लोकसभेच्या 18 जागांवर ठाम,खासदारांच्या बैठकीत निर्णय!**



| वर्ष - 7 | अंक - 281 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 27 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महायुतीत जागावाटपाचा तिढा!

## शिंदेंच्या शिवसेनेचा लोकसभेच्या 18 जागांवर दावा, भाजपचा तो फॉर्म्युला फेटाळला

**।मुंबई ।महाईन्यूज**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्त्वातील शिवसेना लोकसभेच्या १८ जागा लढवण्यावर ठाम असल्याची माहिती आहे. एकनाथ शिंदे आणि खासदारांची बैठक सोमवारी पार पडली, या बैठकीत गेल्या लोकसभा निवडणुकीत जिंकलेल्या १८ जागा लढवण्याची भूमिका पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतली. ज्या चार जागांवर गेल्या लोकसभा निवडणुकीत पराभव झाला होता त्या जागांबाबत एकनाथ शिंदेंनी निर्णय घ्यावा, असं पक्षाच्या वरिष्ठ नेत्यानं म्हटलं आहे.**




शिवसेनेच्या कालच्या बैठकीमध्ये समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. याशिवाय खासदार राहुल शेवाळे आणि मिलिंद देवरा यांना मुंबईतील लोकसभा निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भाजप, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना आणि अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस किती जागा लढवणार हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही.

शिवसेनेनं गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपसोबतच्या युतीत २३ जागांवर लोकसभा निवडणूक लढवली होती. शिवसेनेचे १८ खासदार विजयी झाले होते. शिवसेनेच्या १८ पैकी १३ खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला तर ५ खासदारांनी उद्धव ठाकरेंसोबत राहण्याचा निर्णय घेतला.

गजानन कीर्तिकर यांनी भाजपकडून देण्यात आलेला ३२-१२-४ जागांचा फॉर्म्युला फेटाळत असल्याचं देखील म्हटलं होतं. गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेनेनं लढवलेल्या जागांपैकी रायगड, शिरुर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि सातारा या जागेवर पराभव स्वीकारावा लागला होता. त्यापैकी सातारा वगळता इतर जागांवर शिवसेनेनं विद्यमान खासदारांना उमेदवारी दिली होती.

### 13 खासदारांच्या भविष्याचा विचार व्हावा...

**शिवसेना लोकसभेच्या १८ जागा लढवणार यावर खासदारांच्या बैठकीत सहमती झाली असल्याची माहिती आहे. गेल्या आठवड्यात भाजपकडून शिवसेनेसाठी १२ जागा सोडल्या जाऊ शकतात अशी माहिती समोर आल होती. त्याबाबत गजाजन कीर्तिकर यांनी तो फॉर्म्युला फेटाळला होता. गजाजन कीर्तिकर यांनी एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यासोबत आलेल्या १३ खासदारांच्या भविष्याचा विचार केला पाहिजे, असं म्हटलं होतं. ही माझी वैयक्तिक मतं असून पक्ष काय भूमिका घेईल, हे माहिती नसल्याचं देखली त्यांनी स्पष्ट केलं होतं.**

## आंदोलनादरम्यानच्या हिंसेच्या घटनांची उच्च न्यायालयाकडून दखल

### मराठा आरक्षण : परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी कारवाई करण्याचा सरकारला अधिकार

**।मुंबई ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**मराठ्यांना इतर मागासवर्गांतून (ओबीसी) आरक्षण देण्याच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुकारलेल्या राज्यव्यापी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याची उच्च न्यायालयाने सोमवारी गंभीर दखल घेतली. तसेच, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याचा सरकारला अधिकार असून त्यासाठी न्यायालयाच्या आदेशाची गरज नाही. त्यामुळे, राज्यात कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असेल, तर सरकार बघ्याची भूमिका घेऊ शकत नाही, अशा शब्दांत न्यायालयाने सरकारला कर्तव्याची आठवण करून दिली.**



आंदोलन शांततापूर्ण मार्गाने करण्याची हमी जरांगे यांनी देऊनही तिचे पालन केले नसले, तरी स्थिती आटोक्यात ठेवण्याची जबाबदारी ही सरकारचीच आहे, असेही सरकार स्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी हतबल नसल्याचे नमूद करताना न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती श्याम चांडक यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले.

जरांगे पाटील यांनी राज्यव्यापी रास्ता रोको आंदोलन पुकारले, हे आंदोलन सर्वतोपरी शांततामय मार्गाने केले जाईल, अशी हमीही जरांगे यांनी गेल्या आठवड्यात न्यायालयाला दिली होती. तथापि, राज्यभरात हिंसाचाराच्या अनेक घटना घडल्या. त्यात, एसटी बस जाळण्याच्या, दगडफेक केल्याच्या घटनांचा समावेश आहे.

समृद्धी महामार्गसह विविध ठिकाणी रस्ते अडवण्यात आले, असे जरांगे यांच्या आंदोलनाच्या विरोधात याचिका करणारे वकील गुणरतन सदावर्ते यांनी सुनावणीच्या वेळी न्यायालयाला सांगितले. तर, हिंसाचाराच्या घटनांप्रकरणी राज्यभरात २६७ गुन्हे नोंदवण्यात आल्याची माहिती राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ आणि सरकारी वकील हितेन वेणेगावकर यांनी न्यायालयाला दिली. त्याची दखल घेऊन सरकारला स्थिती नियंत्रणात आणण्यासाठी न्यायालयाच्या आदेशांची गरज नाही. किंबहुना, सरकारकडे आवश्यक त्या कारवाईचे अधिकार असल्याचे न्यायालयाने म्हटले.

### न्यायालयाने सरकारला सुनावले

**गेल्या महिन्यात आपल्या गाडीची तोडफोड करण्यात आली. त्याचप्रमाणे, मराठा नसलेल्या एका तरूणाची हत्या करण्यात आल्याचा आरोप सदावर्ते यांनी केला. तर, या तरूणाने आत्महत्याच केल्याचे सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले. न्यायालयाने मात्र या दोन्ही प्रकरणाचा तपास कोण्त्या टप्प्यात आहे हे पुढील सुनावणीच्या वेळी स्पष्ट करण्याचे आदेश सरकारला दिले.**

# संसदेमध्ये नवरा जाणार की मी?

## सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार टीका

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**माझ्या नवऱ्याने भाषणे ठोकलेली तुम्हाला चालतील का? संसदेमध्ये नवरा जाणार की मी जाणार? असा प्रश्न विचारत खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. त्याचवेळी नवऱ्याला संसदेच्या परिसरात परवानगी नसते. कॅन्टीनमध्ये बसावे लागते. तुम्हाला कसा खासदार पाहिजे, असा प्रश्नही त्यांनी केला.**



अजित पवार बारामती लोकसभा मतदारसंघात जाऊन सुप्रिया सुळे यांना पराभूत करण्याचे अप्रत्यक्ष आवाहन करत आहेत. प्रत्येक आठवड्यात ते एकदातरी बारामती मतदारसंघात सभा घेत आहेत. हाच धागा पकडून सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांना लक्ष्य केले. त्याचबरोबर विरोधकही सुप्रिया सुळे यांच्या इमानदारीचे कौतुक करतात, असे सुळे यांनी आवर्जून सांगितले.राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर पक्ष आणि चिन्ह अजित पवार गटाकडे गेल्यानंतर विद्यमान खासदार सुप्रिया सुळे यांचा बारामती लोकसभा मतदारसंघातील विजय रथ रोखण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कंबर कसली आहे. सत्तेत असलेल्या अजित पवार यांना शह देण्यासाठी आता खुद्द शरद पवार यांनी लक्ष घातले असून, रविवारी (३ मार्च) त्यांनी पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे.सुप्रिया सुळे गेली १५ वर्षे बारामती मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करतात. २००९ साली त्या भाजपच्या कांता नलावडे यांच्या विरोधात सहज विजयी झाल्या. २०१४ साली देशभरात मोदी लाट असताना आणि भाजपने राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांच्या मागे ताकद उभी केली असतानाही सुळे यांनी बालेकिल्ला राखला. लोकसभा २०१९ ला पुन्हा मोदींचा देशभर करिश्मा असताना आणि अमित शहा यांनी बारामतीत सभा घेतल्यानंतरही सुळे या सुमारे दीड लाखांहून अधिक मतांनी विजयी झाल्या.

त्यात अजित पवार यांनी आखलेली रणनीती महत्त्वाची होती. आता राष्ट्रवादीतील फुटीनंतर सर्व समीकरणे बदलली आहेत. खुद्द अजित पवार हे भगिनी सुप्रिया यांच्या पराभवासाठी रणनीती आखत आहेत. त्यासाठी ते पत्नी सुनेत्रा यांनाच निवडणूक रिंगणात उतरवणार हे आता स्पष्ट झाले आहे.या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनीही बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणूक गांभीर्याने घेतली आहे. लेकीसाठी पवार रिंगणात उतरले असून त्याचाच एक भाग म्हणून पवार यांनी रविवारी (३ मार्च) पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. इंदापूरच्या सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या विचारांचा खासदार द्या, असे आवाहन केले. तर सुनेत्रा पवार यांनी तुम्ही समजून घ्यायचे ते घ्या, असे म्हणत उमेदवारीचे स्पष्ट संकेत दिले. त्यांनी इंदापूर पाठोपाठ दौंड आणि पुरंदरमध्येही भेटीगाठीचा सिलसिला कायम ठेवला आहे. त्यामुळे मतदारसंघात प्रचाराने वेग घेतला आहे. इंदापूरमध्ये विद्यमान आमदार दत्तात्रय भरणे हे राष्ट्रवादीचे असून माजी मंत्री हर्षवर्धन पाटील भाजपमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांनाही आपोआपच महायुतीचे काम करावे लागणार आहे.

### अजित पवार यांच्यावर जोरदार टीका

गेल्या निवडणुकीत आमदार राहुल कुल यांच्या पत्नी कांचन यांनी सुप्रिया सुळे यांच्या विरोधात निवडणूक लढवली होती. कुल हे भाजपचे आमदार आहेत. माजी आमदार रमेश थोरात हे अजित पवार यांचे कट्टर समर्थक आहेत. भाजपचे जिल्हाध्यक्ष वासुदेव काळे दौंडमधील आहेत. या सगळ्यांना स्थानिक मतभेद विसरून आता सुनेत्रा पवार या उमेदवार असतील तर त्यांचाच प्रचार करावा लागेल. सध्या सुनेत्रा पवार यांनी येथे भेटीगाठी सुरु केल्या आहेत.माझ्या नवऱ्याने भाषणे ठोकलेली तुम्हाला चालतील का? संसदेमध्ये नवरा जाणार की मी जाणार? असा प्रश्न विचारत खासदार सुप्रिया सुळे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली.

---

# तरुणींच्या व्हिडीओने 'पिट्याभाई' अडचणीत येणार?

## व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणीमहिला आयोगाकडे तक्रार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील वेताळ टेकडीवर कथित अमली पदार्थाच्या नशेत असलेल्या मुलींचा व्हिडीओ व्हायरल केल्याप्रकरणी अभिनेता रमेश परदेशी अडचणीत येण्याची शक्यता आहे. नशेत असलेल्या मुलींचा व्हिडीओ व्हायरल करताना त्याने मुलींचा चेहरा ब्लर केला नाही. त्यामुळे त्याच्याविरोधात महिला आयोगाकडे तक्रार करण्यात आली.**

विशेष म्हणजे या व्हिडीओत रमेश परदेशी यांनी या व्हिडीओत या तरुणी अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याचा दावा केला होता. मात्र, तक्रारदार नेहा पुरव यांनी पोलिसांच्या हवाल्याने या तरुणी अमली पदार्थाच्या आहारी नसल्याचे स्पष्ट केले. रविवारी, अभिनेते रमेश परदेशी यांनी वेताळ टेकडीवरील व्हिडीओ आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट केला होता. या व्हिडीओत दोन तरुणी नशेच्या आहारी गेल्याचे दिसत होते. एक मुलगी बेशुद्ध अवस्थेत आहे तर दुसऱ्या मुलीने अंमली पदार्थ घेतल्याने नशेत बडबड करत असल्याचा दावा करण्यात आला. हा व्हिडीओ पोस्ट करत रमेश परदेशी यांनी म्हटले की, वेताळ टेकडीवर आम्ही मॉर्निंग वॉकला आलो होतो. तर इथं महाविद्यालयात पहिल्या वर्षाला



शिकणाऱ्या या दोन तरुणी बियर, दारु आणि नशेचं काहीतरी घेऊन टेकडीच्या कोपऱ्यात पडल्या होत्या. या तरुणींना आम्ही इथं सेफ जागी घेऊन आलो. हे यासाठी सांगतोय कारण पुण्यात दोन दिवसांपूर्वी 4 हजार कोटींचं ड्रग्ज सापडलं आहे. मुंबईतील पत्रकार नेहा पुरव यांनी व्हायरल झालेल्या व्हिडीओवर संताप व्यक्त केला. नेहा पुरव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, पुण्यात दोन मुली नशेच्या अमलाखाली कथित संस्कृती रक्षकांना आढळून आल्या. सगळ्यात आधी त्या मुलींनी जे केले ते अत्यंत चूकच आहे.

त्या बद्दल त्यांना माफ करताच येणार नाही. पण या मुलींचे वय आणि त्यांची पुढील करिअर, पुढील आयुष्य बघता हा व्हीडिओ व्हायरल करणे किती योग्य होते? त्यांचे चेहरे न दाखवता स्वतःच्या समाजसेवेचा डांगोरा पिटता आला नसता का? असा सवाल त्यांनी केला. नेहा पुरव यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, मी या प्रकारानंतर पुण्याच्या कोथरूड पोलीस स्टेशन मधुन पत्रकार म्हणून माहिती घेतली. तेव्हा या मुली बिअर प्यायला होत्या आणि पोटात अन्न नसल्याने त्यांना नशा आल्याचे पोलिसानी सांगितले. या मुलींनी ड्रग्ज घेतले नव्हते, अशी माहिती पुरव यांनी दिली.

### नशेत बडबड करत असल्याचा दावा

या प्रकारानंतर नेहा पुरव यांनी राज्य महिला आयोगाकडे ऑनलाईन तक्रार दाखल केली. महिला आयोगाने ही तक्रार दाखल केली असल्याचे नेहा पुरव यांनी म्हटले. या व्हिडीओत रमेश परदेशी यांनी या व्हिडीओत या तरुणी अंमली पदार्थाच्या आहारी गेल्याचा दावा केला होता. रविवारी, अभिनेते रमेश परदेशी यांनी वेताळ टेकडीवरील व्हिडीओ आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट केला होता. या व्हिडीओत दोन तरुणी नशेच्या आहारी गेल्याचे दिसत होते. एक मुलगी बेशुद्ध अवस्थेत आहे तर दुसऱ्या मुलीने अंमली पदार्थ घेतल्याने नशेत बडबड करत असल्याचा दावा करण्यात आला.

# अमृत भारत अंतर्गत चिंचवड, देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशनचा होणार कायापालट!

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन भूमीपूजन

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या पाठपुराव्याने रेल्वे स्टेशनचा कायापालाट केला जात आहे. आकुर्डी, तळेगाव दाभाडे या स्टेशनच्या विस्तारानंतर आता अमृत भारत रेल्वे स्टेशन योजना दोन अंतर्गत चिंचवड,देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशनच्या विस्तारीकरणाच्या कामाचे भूमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज (सोमवारी) ऑनलाइन माध्यमातून झाले आहे. तसेच शेलारवाडी,जांभूळ, कामशेत या ठिकाणी बांधलेल्या अंडरपास पुलाचे उद्घाटन व पोल क्र.४७ मळवली स्टेशन जवळ अंडरपासच्या कामाचे भूमिपूजनही झाले.**




रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव ऑनलाइन सहभागी झाले होते. तर, खासदार श्रीरंग बारणे हे चिंचवड, देहूरोड रेल्वे स्टेशन येथे उपस्थित होते. देशातील रेल्वे स्टेशनचा कायापालट करण्याचा मनोदय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आहे. रेल्वे स्टेशनचा विकास करण्यासाठी केंद्र सरकारने अमृत भारत स्टेशन ही योजना हाती घेतली आहे. या योजनेत मावळ मधील रेल्वे स्टेशनचा समावेश करण्यासाठी खासदार बारणे यांनी सातत्याने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. रेल्वे स्टेशनचे विस्तारीकरण, सुशोभीकरण व्हावे, प्रवाशांना चांगल्या सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी खासदार बारणे हे गेल्या अनेक दिवसांपासून प्रयत्न करत होते. त्यांच्या पाठपुराव्यानुसार मावळ लोकसभा मतदारसंघातील चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव दाभाडे या चार स्टेशनचा योजनेत समावेश झाला होता. त्यातील पहिल्या टप्प्यातील आकुर्डी आणि तळेगाव दाभाडे या स्टेशनच्या विस्तारीकरण, सुशोभीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

आता अमृत भारत योजना दोन अंतर्गत चिंचवड, देहूरोड, लोणावळा रेल्वे स्टेशन नूतनीकरण व सुधारचे काम हाती घेतले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाइन कामाचे भूमीपूजन झाले. तसेच शेलारवाडी,जांभूळ व कामशेत या ठिकाणी बांधलेल्या अंडरपास पुलाचे उद्घाटन व पोल क्र.४७ मळवली स्टेशन जवळ अंडरपास या कामाचे भूमिपूजन देखील पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते झाले.

### विस्तारीकरणात काय होणार..

रेल्वे स्थानकावर फुटओव्हर ब्रीज, प्रतीक्षा रुम, स्वच्छतागृह, विद्युत व्यवस्था, सिग्नल, दिव्यांगासाठी सोयी-सुविधा, पर्यावरणपूरक वातारण, आवश्यकतेनुसार लिफ्ट, मोफत वाय-फाय, साफसफाई, अत्याधुनिक सूचना प्रणाली, वाहनतळासाठी जागा, शेड उपलब्ध करुन दिले जाणार असून रेल्वे स्टेशनचा कायापलट होणार आहे. मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वे स्टेशनचा विस्तार केला जात आहे. प्रवाशांना विविध सुविधा दिल्या जात आहेत. रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण केले जात आहे. पनवेल रेल्वे स्टेशनचा नव्याने विकास आराखडा होत आहे. ट्रॅक वाढविले जात आहे. लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा दिला जात आहे. या विभागातील रेल्वेचा कायापालट करण्याचे काम श्रीरंग बारणे यांच्या माध्यमातून होत आहे.

---

# रन फॉर अमृतकाल स्पर्धेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## युवा उद्योजक आणि माजी नगरसेवक सनी निम्हण यांच्या वाढदिवसानिमीत्त आयोजन

।पिंपरी चिंचवड ।प्रतिनिधी : महाईन्यूज

**युवा उद्योजक आणि माजी नगरसेवक सनी विनायक निम्हण ( BANER) यांच्या वाढदिवसानिमीत्त (20 फेब्रुवारी)सोमेश्वर फौंडेशनच्या वतीने आयोजित सुपर सनी विक" पुणे ट्रीन सिटी मॅरेथॉन – रन फॉर अमृतकाल स्पर्धेत धुलदेव घागरे, अर्चना आढाव, नागेश कांडे,राणी मुलचंदानी यांनी अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी येथे पार पडलेल्या या स्पर्धेला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, मा. नगरसेवक सनी निम्हण, माजी भारतीय हॉकीपटू धनराज पिल्ले, रेस डायरेक्टर यश राईकर, एव्हरेस्टवीर किशोर धनकुडे, संयोजन समिती सचिव चंद्रकांत निम्हण आदी मान्यवर उपस्थित होते.**



यावेळी बोलताना भारतीय हॉकी संघाचे माजी कर्णधार धनराज पिल्ले म्हणाले, फिट इंडिया , फिट महाराष्ट्र ,फिट पुणे बनवण्याच्या दृष्टीने पुणे ट्रीन सिटी मॅरेथॉन – रन फॉर अमृतकालचे आयोजन करून सनी निम्हण यांनी महत्वाची भूमिका बजावली. पुणेकरांनी मोठया प्रमाणात सहभाग घेत पुण्याला स्पोर्टस सिटी बनविण्याच्या दृष्टीने महत्वाचे पाऊल टाकले .

चंद्रकांत पाटील म्हणाले, मन शरीर आणि बुद्धी यांना चालना मिळावी या दृष्टीने 'सुपर सनी विक' चे आयोजन करत सनी निम्हण यांनी नागरिकांना व्यायामाकडे वळविण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट नियोजन करत सुंदर उपक्रम राबविला आहे.

10 किमी पुरुष गटात धुलदेव घागरेने 33 मिनिटे 08 सेकंद वेळ नोंदवत अव्वल क्रमांक पटकावला. तर पंकज नेवासे (00 .33 .16 से) याने दुसरा, अभिजीत भस्मे(00 .33 .30 से) याने तिसरा क्रमांक पटकावला. महिला गटात अर्चना आढावने 39 मिनिटे 47 सेकंद वेळ नोंदवत पहिला क्रमांक पटकावला. थीर्धा गोपाकुमार के(00.40.22 से) व निशा पासवान(00.41.14 से) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला.

21 किमी पुरुष गटात नागेश कारंडे याने 01 .11 .09 सेकंद वेळ नोंदवत प्रथम क्रमांक मिळवला. विकास पोळ(01 .13 00 से) याने दुसरा, निक्कू ॲथलेट्स(01 .13 . 29 से) याने तिसरा क्रमांक पटकावला.

महिला गटात राणी मुलचंदानी(01.23.26 से) हिने विजेतेपद पटकावले. शितल तांबे(01 .39 .57 से)ने दुसरा आणि साजीनी रोशन(02 .04 .41 से) हिने तिसरा क्रमांक मिळवला.

### स्पर्धेत 25000 धावपटूंचा सहभाग

स्पर्धेत 25000 धावपटूंनी आपला सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील 21 किलोमीटर मॅरेथॉनचा फ्लॅग ऑफ 5.30 वाजता, तर 10 किलोमीटर अर्धमॅरेथॉन स्पर्धेचा फ्लॅगऑफ सकाळी 5:45 वाजता झाला. 21 किलोमीटर अंतराच्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी बालेवाडी स्टेडियम ते राधा चौक, बाणेर फाटा, औंध, विशालनगर मार्गे, बालेवाडी हायस्ट्रीट वरून पुन्हा बालेवाडी स्टेडियम असा मार्गक्रमण होता.स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना करंडक, पदक आणि आकर्षक अशी पारितोषिके देण्यात आली.




# 'एडीआर'सारखे गट हवेच, ते का?

**निवडणूक रोख्यांना न्यायालयीन मार्गाने रोखणारी, त्याहीआधी कोट्यधीश उमेदवारांसह सर्वच निवडणुकेच्छूंची आर्थिक व गुन्हेगारी कुंडली जनतेसमोर यावी यासाठी यशस्वी झुंज देणारी आणि 'आंदोलनजीवी' अशी हेटाळणी करणाऱ्यांच्या मुक्ताफळांपासून दूर राहिलेली बुद्धिजीवींची संस्था म्हणजे 'एडीआर'! तिच्या २७ वर्षांच्या वाटचालीची ही ओळख.**

तीनशे चारशे वर्षांपूर्वी संत एकनाथांनी महाराष्ट्रातील अनेक देवी देवतांना साकडे घातले होते.. 'दार उघड बया दार उघड' म्हणून! जणू काही त्यांचीच आवृत्ती म्हणजे गेली २५ वर्षे देशातील लोकशाही व्यवस्था सुधारावी म्हणून एका सामाजिक संस्थेने सुरू ठेवलेले काम. ही संस्था न्यायालयांचे दरवाजे ठोठावते आहे. आणि काही दरवाजे किलकिले होऊन उघडतही आहेत. विशेष म्हणजे ही संस्था चालवणारे अनेक जण सामाजिक अथवा चळवळीतील कार्यकर्ते किंवा अलीकडच्या काळात सरकारने बदनाम केलेले 'आंदोलनजीवी' नाहीत. ते भारतातील पांढरपेशा वर्गातील, उच्च शिक्षित व सुखवस्तू म्हणावे असे नामवंत संस्थांतील प्राध्यापक आहेत. मात्र ते पछाडलेले आहेत ते राजकारणातील वाढत्या भ्रष्ट बजबजपुरीचे उच्चाटन करण्यासाठी. किडलेल्या व्यवस्थेला दुरुस्त करण्यासाठी आणि राजकीय



क्षेत्रातील पैसा आणि हितसंबंध यांच्या साटेलोटेविरुद्ध दाद मागण्यासाठी त्यांनी चंग बांधला आहे. त्यांचा मार्ग न्यायालयीन लढ्याचा. ही संस्था म्हणजे 'असोशिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' (एडीआर)!याच संस्थेने निवडणूक रोख्यांच्या वैधतेला जे आव्हान दिले, त्यातून सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे नवल घडले. इतके दिवस जी माहिती गोपनीय होती ती आता सर्वांना उपलब्ध होणार आहे. राजकीय पक्षांना अनेक धनिक व उद्योजक निवडणुकीपूर्वी भरघोस देणग्या देतात हे काही नवीन नव्हते. निवडणूक रोख्यांच्या मिषाने ते सत्य झाकण्याचा अयशस्वी प्रयत्न सत्ताधारी पक्षाने केला. तथापि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने हा प्रयत्न अयशस्वी ठरला. येत्या काही दिवसांतच कोणी- कोणाला- किती- कधी पैसे दिले हे सर्वांना समजेल. त्यामुळे "आम्ही इतरांपेक्षा वेगळे आहोत"- पार्टी विथ डिफरन्स- असे म्हणणारे यांचे नैतिक मूल्यमापनही सर्व माहिती जगजाहीर झाल्यानंतर नव्याने होऊ शकेल.निवडणूक, त्यातील राजकीय पक्ष, इत्यादीबद्दल माझ्यासारख्या मध्यमवर्गीय, सदाशिव पेठेत वाढलेल्या व्यक्तीला फार समज असणे अपेक्षितही नव्हते. अगदी लहानपणच्या काही आठवणी म्हणजे निवडणूक जवळ आली की गल्ली गल्लीतून फिरणाऱ्या रिक्षा व त्यांच्या घोषणा- 'ताई माई अक्का, विचार करा पक्का, हातावर मारा शिक्का!' दुसरी आठवण म्हणजे त्या वेळच्या जनसंघाला आमच्या गल्लीतून फार तर पंधरा-वीस मते मिळतील, याची कल्पना असूनही, गल्लीतील प्रत्येक व्यक्तीच्या घरी हाताने लिहिलेल्या निवडणुकीच्या मतदाराच्या स्लिप्स आणून देणाऱ्या एक कार्यकर्त्या. तिसरी आठवण आणीबाणी संपवणाऱ्या निवडणूक काळातल्या सभा आणि लोकांचा प्रतिसाद यांची. वयाप्रमाणे शिक्षण, अनुभव व देशातील प्रवास-राहणे झाल्यानंतर निवडणुका-त्यातील राजकारण- अर्थकारण- समाजकारण यातील गुंतागुंत हळूहळू लक्षात येऊ लागली. "सत्तेवर येणारा प्रत्येकच पक्ष काँग्रेस असतो" असे एक मौलिक विधान सुमारे वीस वर्षांपूर्वी माझ्या परिचयातील एका सामाजिक कार्यकर्त्यांनी केले होते.. त्याचा अर्थ मात्र २००१ ते २०१५ या काळात दिल्लीत राहिल्यावर नीटच समजला. राजकारण सुस करणाऱ्या 'एडीआर'बद्दलचा आदर वाढला तो यानंतरच्या काळात.१९९७ मध्ये एक छोटासा प्रयोग म्हणून सुरू झालेल्या या संस्थेचा प्रवास नाट्यमय आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्मस'ची कल्पना त्यावेळेस आय आय एम अहमदाबाद येथे काम करणारे प्राध्यापक त्रिलोचन शास्त्री व त्यांच्या मित्रांच्या मनात आली.सर्व वातावरण भ्रष्टाचार व त्याच्या संबंधीच्या बातम्यांनी भरले होते. मी एमआयटीतून (मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी हे सार्वजनिक विद्यापीठ) पीएच.डी. पूर्ण करून आलो होतो. बोफोर्स, चारा घोटाळा, दक्षिणेत जयललिता यांच्यावर आरोप असे सर्व राजकारण.

## संपादकीय »

### 'अभिजात' चा तिढा

***मराठी भाषेला अभिजातचा दर्जा मिळावा, यासाठी विविध प्रकारचे पुरावे सादर करूनही प्रश्न मार्गी लागत नाही. या प्रक्रियेच्या आड लालफितीतील बाबूशाहीसह अनेक घटक येत आहेत.***

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्र सरकारने रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली होती. समितीने मराठीच्या प्राचिनतेचा अभ्यास करून १२ जुलै २०१३ रोजी केंद्र सरकारला अहवाल सादर केला. त्यालाही अकरा वर्षे उलटून गेली. मराठी राजभाषा दिन जवळ आला की, आम्हीच मिळवून देऊ अभिजात दर्जा, असे सांगणारे लागोपाठ पाच मुख्यमंत्री झाले. अखिल भारतीय साहित्य महामंडळातर्फे होणाऱ्या साहित्य संमेलनात ठराव केले जातात. प्रत्यक्षात मात्र साहित्य अकादमीने केंद्राकडे पाठवलेल्या अभिजात मराठीच्या प्रस्तावाकडे पाठ फिरवलेली दिसते. ३ ऑगस्ट २०२३ रोजी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री किशन रेड्डी यांनी असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नसल्याचे राज्यसभेत सांगितले.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर केलेल्या आरोपामुळे खळबळ उडणे स्वाभाविक आहे. पण महाराष्ट्राच्या राजकारणाने कधीच व्यक्तीद्वेषाला, जातीय विखाराला थारा दिलेला नाही. येथील संतांची शिकवणही तशीच आहे.

# फडणवीसांवर केलेल्या आरोपामुळे खळबळ

त्यामुळेच अशा परिस्थितीत शांतता, संयम दाखवत प्रगल्भतेने प्रश्न हाताळला पाहिजे.महाराष्ट्राचे राजकारण व्यक्तिमत्वांभोवती फिरते. गोष्टीवेल्हाळ भारतीयांना एक नायक किंवा नायिका हवी असतेच. अवतारांचे येथे पूजन होते, समाजाला सावरण्यासाठी ते अवतरतील, अशी आशा बाळगली जाते. व्यक्तीपुजेचा अन् कधी व्यक्तीद्वेषाचा प्रचंड प्रपात भारतीय राजकारणात कोसळत असतो.लेखाअनुदानासाठी विधिमंडळ अधिवेशनाला प्रारंभ होणार असताना मराठा समाजासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविरोधात जे आरोप केले त्यामुळे व्यक्तीद्वेषाचा नवा अध्याय सुरू तर होणार नाही ना, अशी भीती वाटते. जरांगे हे समाजासाठी तळमळीने काम करणारे लढवय्ये आहेत. कोणत्याही कार्यकर्त्याने प्रत्येक शब्द तोलून-मापून बोलायचा असतो. कसलेल्या राजकारण्याला आपल्या विधानाचे काय अर्थ लावले जातील, हे मनोमन



तपासून पाहायची गरज कळते. पण जरांगे या पठडीत बसणारे नाहीत. मराठा समाज गेली काही दशके प्रगतीची प्रतीक्षा करत होता. सत्तेत चांगल्या संख्येत प्रतिनिधित्व असतानाही प्रगतीचे दरवाजे खुले न झाल्याने मराठा समाजाच्या आरक्षणाची मागणी एकदा नव्हे तर तीनदा मान्य झाली. मागासपणाचे प्रश्न भेडसावणाऱ्या ओबीसी समाजानेही या आरक्षणाचे स्वागत केले. काही दिवसांपूर्वीच्या अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय दोन्ही सभागृहांनी एकमताने घेतला.सरकारविरोधातल्या उद्धव ठाकरे यांनी कोणताही किंतू, परंतू व्यक्त न करता हा निर्णय प्रत्यक्षात येवो, अशा शुभेच्छा दिल्या. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी आरक्षण न्यायालयात टिकेल का? अशी रास्त शंका उपस्थित केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वकिलांची फौज उभी करून न्यायालयात आरक्षण टिकवण्याचे काम सरकार करेल, असे आश्वासन दिले. खरे तर काही काळ प्रतीक्षा करणे गरजेचे आहे. ही प्रक्रिया जरांगे यांनी लक्षात घ्यावी, असे आवाहन समाजातले धुरीण करत आहेत. मात्र त्यांनी १० टक्के आरक्षण हे आंदोलनाला लाभलेले यश किंवा त्याचेच फलित आहे, हे लक्षात न घेता फडणवीस आपल्या जीवावर उठल्याचा आरोप करणे दुर्दैवी आहे. फडणवीसांनी त्यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात आरक्षणाचा प्रश्न सोडवायचा प्रयत्न केला.निवडणुकीच्या तोंडावर पृथ्वीराज चव्हाण यांच्या सरकारनेही मराठा समाजाला आरक्षण दिले; नंतर फडणवीस यांच्या सरकारनेही. दोन्ही वेळच्या प्रक्रियेतल्या त्रुटींवर न्यायालयाने बोट ठेवले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# राज्य बेचिराख होण्यापासून वाचवलं!

## मनोज जरांगे: उपमुख्यमंत्री फडणवीसांवर गंभीर आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. “जे काही रविवारी सरकारने केलं ते काही चांगलं नाही. मी राज्य बेचिराख होण्यापासून वाचवलं आहे. ” असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांच्यावर मनोज जरांगेंनी गंभीर आरोप केले आहेत. पोलिसांनी जर लाठीचार्ज केला असता तर त्याला प्रत्युत्तर म्हणून संपूर्ण राज्य पेटलं असतं. डोकं ठिकाणावर ठेवून आणि विचार करुन बोला असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.**



“देवेंद्र फडणवीस तुम्ही गृहमंत्री आहात. विचार करुन बघा काल काय झालं असतं? तुम्ही बंगल्यात लपून बसला असता पण राज्य जळालं असतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याचा विचार करणं आवश्यक आहे. राज्यातल्या सगळ्या नागरिकांनीही विचार केला पाहिजे.” असं मनोज जरांगे म्हणाले. आज मनोज जरांगे यांनी त्यांचं बेमुदत उपोषण मागे घेतलं आहे. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप केले आहेत.मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. “जे काही रविवारी सरकारने केलं ते काही चांगलं नाही. मी राज्य बेचिराख होण्यापासून वाचवलं आहे. ” असं म्हणत देवेंद्र फडणवीस यांच्यावर मनोज जरांगेंनी गंभीर आरोप केले आहेत. पोलिसांनी जर लाठीचार्ज केला असता तर त्याला प्रत्युत्तर म्हणून संपूर्ण राज्य पेटलं असतं. डोकं ठिकाणावर ठेवून आणि विचार करुन बोला असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे.“मी प्रामाणिकपणे सांगतो आहे.. काहीही गैरप्रकार घडू नये ही देवेंद्र फडणवीस यांची जबाबदारी होती. ती जबाबदारी मी पार पाडली. पाच हजार महिला या ठिकाणी होत्या, तर २० हजार लोक होते. देवेंद्र फडणवीस यांना रात्रीच काहीतरी घडवून आणायचं होतं. लोक सैरावैरा रानात पळाले असते. देवेंद्र फडणवीस यांना दुसऱ्यांदा आंतरवली सराटीसारखा लाठीचार्ज घडवून आणायचा होता. मी राज्य बेचिराख होण्यापासून वाचवलं आहे. पहिला हल्लाही देवेंद्र फडणवीस यांनीच घडवून आणला होता.““इथे आज सकाळी किंवा रात्रीसुद्धा लाठीचार्ज झाला असता तर सर्व मराठा समाज पेटून उठला असता. पुन्हा एकदा राज्य बेचिराख होण्यापासून मी वाचवलं आहे. पहिल्या लाठीचार्जनंतर जो उद्रेक झाला त्यातल्या केसेस अजूनही मागे घेण्यात आलेल्या नाहीत. त्यांना आतापर्यंत वाटलं असतं की, माझी जनता आहे. तर त्यांनी केसेस मागे घेतल्या असत्या. त्यांनी पोलीस बाजूला सारावेत. सागरचा दरावाजा उघडावा मी यायला तयार आहे. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगू इच्छितो की, मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नका. सगेसोयरेची अंमलबजावणी करण्यासाठी तयारीला लागा” असंही जरांगे म्हणाले.मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या अनेक महिन्यांपासून कधी आंदोलन तर कधी उपोषणाचा मार्ग स्वीकारणारे मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. रविवारी आंतरवली सराटीमध्ये घेतलेल्या पत्रकार परिषदेत जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले. मराठा समाजाला ओबीसी कोट्यातून आरक्षण न मिळण्यामागे देवेंद्र फडणवीसच असल्याचा दावा जरांगे पाटील यांनी केला होता. त्यापाठोपाठ त्यांनी देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर जाऊन आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता. मात्र, प्रकृती बिघडल्यामुळे ते आंतरवली सराटीमध्ये परतले. आज दुपारी त्यांनी बेमुदत उपोषण स्थगित करत असल्याचं जाहीर केलं.रविवारी मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीसांच्या सागर बंगल्यावर उपोषण करण्याचा निर्धार बोलून दाखवला व ते मुंबईच्या दिशेनं निघाले. मात्र, वाटेत त्यांची प्रकृती बिघडल्यामुळे ते आंतरवली सराटीमध्ये परतले. तिथे त्यांनी उपचार घेतले.

### तर मराठा समाज पेटून उठला असता

“इथे आज सकाळी किंवा रात्रीसुद्धा लाठीचार्ज झाला असता तर सर्व मराठा समाज पेटून उठला असता. पुन्हा एकदा राज्य बेचिराख होण्यापासून मी वाचवलं आहे. पहिल्या लाठीचार्जनंतर जो उद्रेक झाला त्यातल्या केसेस अजूनही मागे घेण्यात आलेल्या नाहीत. त्यांना आतापर्यंत वाटलं असतं की, माझी जनता आहे. तर त्यांनी केसेस मागे घेतल्या असत्या. त्यांनी पोलीस बाजूला सारावेत. सागरचा दरावाजा उघडावा मी यायला तयार आहे. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सांगू इच्छितो की, मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नका. सगेसोयरेची अंमलबजावणी करण्यासाठी तयारीला लागा” असंही जरांगे म्हणाले.

# शंकर साखर कारखान्यावर मोहिते-पाटील गटाचे वर्चस्व!

## आ. मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली 19 जागा बिनविरोध

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सदाशिवनगर (ता . माळशिरस) येथील श्री शंकर सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत सत्ताधारी मोहिते-पाटील गटाने सर्वच्या सर्व २१ जागा जिंकून वर्चस्व राखले. १९ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. उर्वरीत दोन जागांसाठी विरोधकांनी आव्हान दिले होते.**

परंतु यात मोहिते-पाटील गटाने एकतर्फी बाजी मारली. दोन्ही विरोधी उमेदवारांना आनामत रकम गमवाव्या लागल्या.

यापूर्वी अनेक वर्षे आजारी पडलेला आणि दिवंगत माजी मंत्री प्रतापसिंह मोहिते-पाटील आणि त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या ताब्यात असताना श्री शंकर सहकारी साखर कारखाना शेवटी बंद पडून अवसायानात निघण्याच्या स्थितीत होता. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते-पाटील आणि भाजपचे नेते आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील या चुलत भावंडांमध्ये मागील १०-१५ वर्षांपासून



कौटुंबिक आणि राजकीय वैमनस्य कायम आहे. या पार्श्वभूमीवर पाच वर्षांपूर्वी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी हा कारखाना अवसायानात निघण्यापासून वाचवला आणि नंतर संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रियेतून ताब्यात घेतला होता. सध्या हा कारखाना सुरळीतपणे सुरू आहे. या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असताना आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली १९ जागा बिनविरोध झाल्या. उर्वरीत दोन जागांवर मोहिते-पाटील विरोधक भानुदास सालगुडे-पाटील यांच्या नेतृत्वाखालील श्री शंकर बचाव समितीने माळशिरस आणि इस्लामपूर गटातून अनुक्रमे गोपाळ गोरे व उत्तम बाबर यांना उभे केले होते. त्यासाठी सरासरी ६५.६३ टक्के मतदान होऊन मतमोजणी झाली. यात दोन्ही विरोधी उमेदवारांना पराभव पत्करताना आपल्या अनामत रकमाही वाचविता आल्या नाहीत. उमेदवारांना मिळालेली मते पुढील प्रमाणे : मोहिते पाटील गट--माळशिरस ऊस उत्पादक गट-ॲड . मिलिंद कुलकर्णी ( ३५५८ मते ), ॲड. सुरेश पाटील (३५५३)

### मतदारांनी विरोधकांना झिडकारले

इस्लामपूर गट-मोहिते-पाटील गट-बाळासाहेब माने (३५६८), कुमार पाटील (३५३६ ) आणि दत्तात्र्यय रणनवरे ( ३४८९ ) विजयी विरूध्द उत्तम बाबर (२९०). पराभूत उमेदवारांना अनामत रक्कम वाचविण्यासाठी किमान ५५० मते मिळणे अपेक्षित होते. परंतु त्यापेक्षाही निम्मीच मते त्यांच्या पदरात टाकून मतदारांनी विरोधकांना झिडकारले.

# काँग्रेस प्रकल्पांना आम्ही पूर्ण केलं!

## पंतप्रधान मोदींची टीका; कृष्णा-कोयनाचा केला उल्लेख

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“पराभूत मनाने विजय मिळणे अशक्य आहे. यासाठी मागच्या दहा वर्षात देशाच्या मनोधैर्यात जो बदल झाला, तो खूप महत्त्वाचा वाटतो. याआधी अनेक दशके ज्यांनी सरकार चालवले. त्यांचा भारताच्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता. त्यांनी भारतीयांना कमी समजले. मागच्या दहा वर्षात आम्ही त्या भयावह स्थितीतून देशाला बाहेर काढले”, असे सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली. टिव्ही ९ वृत्तसमूहाच्या वार्षिक संमेलन ‘व्हॉट इंडिया थिंक्स टुडे’च्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले विचार मांडले.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, “आम्ही एकविसाव्या शतकात छोटा विचार करणे सोडून दिले आहे. आज आम्ही जे करतो, ते बेस्ट आणि बिगेस्ट असते. भारताची प्रगती पाहून संपूर्ण विश्व अचंबित झाले आहे. भारताबरोबर चालण्यात इतर राष्ट्रांना स्वतःचा फायदा दिसतो. काँग्रेसच्या काळातील परकीय गुंतवणूक आणि मागच्या दहा वर्षातील गुंतवणूक पाहा. काँग्रेसच्या काळात ३०० अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली आणि आमच्या सरकारच्या काळात फक्त १० वर्षात ६४० अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली. आज देशात प्राप्तीकर भरणाऱ्यांची संख्या वाढली आहे. हा सरकारवर दाखवलेला विश्वास आहे.”पंतप्रधान मोदी पुढे म्हणाले की, २०१४ पर्यंत देशातील नागरिकांनी म्युच्युअल फंडात ९ लाख कोटी गुंतवले होते. मात्र आज २०२४ मध्ये देशातील नागरिकांनी जवळपास ५२ लाख कोटींहून अधिकची रक्कम म्युच्युअल फंडात गुंतविली आहे. देशात जे परिवर्तन आले, त्यासाठी सरकारची दूरदृष्टी कारणीभूत आहे.“माजी पंतप्रधान पंडित नेहरुंनी १९६० च्या दशकात सरदार सरोवर प्रकल्पाचे भूमिपूजन केले होते. ६० वर्ष सरदार सरोवर धरणाचे काम रखडले होते. आमचे सरकार आल्यानंतर आम्ही काम पूर्ण करून २०१७ साली याचे लोकार्पण केले. महाराष्ट्रातील कृष्णा-कोयना योजना १९८० च्या दशकात सुरु झाली. २०१४ पर्य ही योजना रखडली होती. याचेही काम आम्हीच पूर्ण केले”, अशा अनेक योजनांचा दाखला देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले सरकार किती कार्यक्षम आहे, याचे दाखले दिले. पंतप्रधान पुढे म्हणाले, मागच्या १० वर्षात मी १७ लाख कोटींच्या किमतीच्या प्रकल्पांची उजळणी केली आहे. तेव्हा कुठे हे सर्व प्रकल्प पूर्ण झाले. मुंबईचा अटल सेतू हा समुद्रावरील सर्वात मोठा प्रकल्पाचे मी नुकतेच उदघाटन केले आहे. मी जी मोदीची गॅरंटी म्हणतो, ती हीच आहे. करदात्याच्या पैशांचा जेव्हा सन्मान केला जातो, तेव्हाच देश पुढे जातो. भारतीय रेल्वे खात्यासाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे असं म्हटलं तर मुळीच वावगं ठरणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज ४१ हजार कोटींच्या प्रकल्पांची घोषणा केली. दोन हजारांहून जास्त प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी एकट्या रेल्वेखात्यासाठी घेऊन आले आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेतंर्गत ५५३ स्टेशन्सची पुनर्बांधणी केली जाणार आहे. तसंच हे सगळे प्रकल्प आणि देशाला समर्पित करतो आहोत असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आजच्या निर्णयामुळे देशातल्या २७ राज्यांमधल्या ५५३ रेल्वे स्थानकांचा कायापालट होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याविषयी त्यांच्या X अकाऊंटवरुनही माहिती दिली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाइन प्रेस कॉन्फरन्स घेत विविध प्रकल्प आणि योजनांचं उद्घाटन केलं. यावेळी केंद्रीय रेल्वे मंत्रीही उपस्थित होती. आपण पहिल्यांदाच २ हजार योजना एकाचवेळी सुरु करत आहोत. रेल्वेच्या पायाभूत बदलांमध्ये महत्त्वाच्या बदलांची सुरुवात करण्याचा हा दिवस आहे असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे.याशिवाय १५०० ओव्हरब्रिज, अंडरपास यांचंही भूमिपूजन करण्यात आलं. उत्तर प्रदेशात २५२, महाराष्ट्रात १७५, मध्यप्रदेशात १३३, गुजरात १२८, तामिळनाडूत ११५, राजस्थानात १०६, छत्तीसगड ९० आणि झारखंडमध्ये ८३ प्रकल्पांचा समावेश आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले, “आम्ही एकविसाव्या शतकात छोटा विचार करणे सोडून दिले आहे. आज आम्ही जे करतो, ते बेस्ट आणि बिगेस्ट असते. भारताची प्रगती पाहून संपूर्ण विश्व अचंबित झाले आहे. भारताबरोबर चालण्यात इतर राष्ट्रांना स्वतःचा फायदा दिसतो. काँग्रेसच्या काळातील परकीय गुंतवणूक आणि मागच्या दहा वर्षातील गुंतवणूक पाहा. काँग्रेसच्या काळात ३०० अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली आणि आमच्या सरकारच्या काळात फक्त १० वर्षात ६४० अब्ज डॉलरची परकीय गुंतवणूक आली. आज देशात प्राप्तीकर भरणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

### महाराष्ट्राला काय मिळालं?

“पराभूत मनाने विजय मिळणे अशक्य आहे. यासाठी मागच्या दहा वर्षात देशाच्या मनोधैर्यात जो बदल झाला, तो खूप महत्त्वाचा वाटतो. याआधी अनेक दशके ज्यांनी सरकार चालवले. त्यांचा भारताच्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता. त्यांनी भारतीयांना कमी समजले. मागच्या दहा वर्षात आम्ही त्या भयावह स्थितीतून देशाला बाहेर काढले”, असे सांगताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली. टिव्ही ९ वृत्तसमूहाच्या वार्षिक संमेलन ‘व्हॉट इंडिया थिंक्स टुडे’च्या दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले विचार मांडले.अमृत भारत योजनेच्या अंतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी संपूर्ण देशासाठी ५५४ रेल्वे स्टेशन्सचा विकास होणार आहे. एकट्या महाराष्ट्रासाठी १५ हजार ५४० कोटींचं बजेट ठेवण्यात आलं आहे. यामुळे रेल्वे स्थानकांचा कायापालट होणार आहे. दिवा, मुंब्रा, शहाड यासाठीही निधी देण्यात आला आहे. दिवा-सीएसटी ही लोकल सुरु करण्याचीही मागणी होते आहे. त्यासाठी आम्ही पाठपुरावा करतो आहोत असंही श्रीकांत शिंदे यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले,.

# सिंहाचं नाव अकबर अन् सिंहिणीचं नाव सीता

## त्रिपुराच्या वादात मोठी कारवाई अधिकाऱ्याला केले निलंबित

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सिंह आणि सिंहिणीचं नाव अकबर आणि सीता ठेवणाऱ्या त्रिपुरातील प्राणिसंग्रहालयातील अधिकाऱ्याला त्रिपुरा सरकारने निलंबित केले आहे. नामकरणावरून झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर त्रिपुरा सरकारकडून राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव आणि पर्यावरण पर्यटन) प्रवीण लाल अग्रवाल यांना निलंबित करण्यात आले आहे.**

सिंह अन् सिंहिणीची अशी नावे ठेवून आमच्या धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत विश्व हिंदू परिषदेने (VHP) कोलकाता उच्च न्यायालयात केलेल्या याचिकेनंतर हे निलंबन करण्यात आले आहे.त्रिपुरातील सेपाहिजाला प्राणिसंग्रहालयातून १२ फेब्रुवारीला उत्तर बंगालच्या सिलीगुडी येथील सफारी पार्कमध्ये आणलेल्या वन्य प्राण्यांची विचित्र नावे असल्याचे बातमीवरून समजले. बांगला वृत्तपत्र उत्तरबंगा संवादमध्ये यासंदर्भात बातमी छापून आली होती. बातमीला



“संगीर खोजे अस्थिर सीता (सीता आपल्या साथीदारामुळे अस्वस्थ आहे)” असा मथळा दिला होता. त्यानंतर हा वाद उफाळून आला. देशभरातील सर्व हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्याचं सांगत याविरोधात विश्व हिंदू परिषदेकडून याचिका दाखल करण्यात आली. उत्तरबंगा संवादने राज्य प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या सचिवाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकाची माहिती प्रकाशित केली, ज्यात सिंहांच्या नावांचा उल्लेख आहे. त्यानंतर विश्व हिंदू परिषदेने हे अतार्किक आणि अपमानजनक असल्याचे सांगत कोलकाता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

### न्यायालयाने काय म्हटले?

त्रिपुराच्या सिपाहिजाला प्राणिसंग्रहालयातून आठ प्राणी सिलिगुडी सफारी पार्कमध्ये आणण्यात आलेत. यामध्ये ‘अकबर’ आणि ‘सीता’ नावाच्या सिंह आणि सिंहिणींचाही समावेश आहे.सिंहिणीला सीतेचे नाव का दिले? कारण हे नाव स्नेहभावाने ठेवता आले असते, असं न्यायमूर्तींनी सांगितले. त्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, ही हिंदू धर्माची निंदा आहे, प्रेमळपणा नाही. जर प्राण्यांना देवतांची नावे देण्यास परवानगी दिली तर उद्या गाढवाचे नावदेखील एखाद्या देवतेचे नावावरून ठेवले जाईल. त्यानंतर सिंहांची नावे नेमकी कोणी ठेवली हे अस्पष्ट असल्यामुळे न्यायालयाने राज्य

# पती डॉक्टर, तर माधुरी दीक्षितच्या सासऱ्यांचं शिक्षण किती?

बॉलीवूडची धकधक गर्ल माधुरी दीक्षितने १७ ऑक्टोबर १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेने यांच्याशी लग्न केलं. लग्नानंतर काही काळ माधुरीने इंडस्ट्रीमधून ब्रेक घेतला होता. पुढे, काही वर्षांत नेने कुटुंबीय अमेरिकेहून भारतात परतलं आणि माधुरीने बॉलीवूडमध्ये पुनरागमन केलं. डॉ. नेने यांचे आई-वडील याआधी फारसे कॅमेऱ्यासमोर आले नव्हते. 'पंचक' चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्रीच्या सासू-सासऱ्यांनी सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. याशिवाय डॉ. नेने सोशल मीडियावर त्यांचे अनेक कौटुंबिक फोटो शेअर करत असतात. नुकतीच त्यांनी आपल्या युट्यूब चॅनेलला आई-बाबांची मुलाखत घेतली. यावेळी त्यांचे वडील माधव नेने यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाबद्दल सांगितलं.माधुरी दीक्षितचे सासरे म्हणाले, "मी १९६३ ला इंग्लंडला गेलो त्याआधी आम्ही दादरला शिवाजी पार्क परिसरात राहायचो. मला तीन भाऊ आणि एक बहीण... अशी आम्ही पाच भावंडं एकत्र वाढलो.

माझं मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण दादरच्या छबीलदास शाळेत पूर्ण झालं. त्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी मी एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यावेळी मी लोकल ट्रेनने प्रवास करायचो. अर्थात महाविद्यालयात मी असताना प्रचंड



अभ्यास केला. माझे दोन्ही काका त्याकाळी उच्चशिक्षित असल्याने त्यांच्याकडे बघून मी माझा शैक्षणिक प्रवास पूर्ण केला."माधव नेने पुढे म्हणाले, "कालांतराने मी पुणे इंजिनियरिंग कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सगळ्या विषयात चांगले गुण असल्याने मला कोणत्याही महाविद्यालयात अगदी सहज प्रवेश मिळाला असता. १९६० मध्ये शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याच्या पुढचं एक वर्ष मी टाऊन प्लॅनिंग विभागात नोकरी केली. त्यानंतर मी 'जे.सी.गॅमन कंपनी'मध्ये रुजू झालो कारण, माझं पदवीपर्यंतचं शिक्षण स्थापत्य अभियांत्रिकी विभागात (CIVIL ENGINEERING) पूर्ण झालं होतं. हळुहळू मला परदेशातील शिक्षणाचं महत्त्व समजलं. पुढे तीन वर्षे नोकरी करून मी पैसे जमावले आणि इंग्लंड येथील इम्पेरियल महाविद्यालयात शैक्षणिक प्रवेशासाठी अर्ज केला. मोडक म्हणून प्रसिद्ध इंजिनिअर होते त्यांनी मला या संपूर्ण प्रवासात खूप मदत केली."

## मीसुद्धा सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो

चार वर्षं उलटून गेली तरी अजूनही सुशांत सिंह राजपूतच्या मृत्यूबद्दल चर्चा होताना दिसत आहे. त्याचे चाहते अजूनही या धक्क्यातून पूर्णपणे सावरलेले नाहीत. सुशांतच्या मृत्यूमागचं गूढ हे अजूनही कायम आहे. पोलिसांनी जरी त्याची केस बंद केली असली तरी याबद्दल सोशल मीडियावर चर्चा होताना आपल्याला पाहायला मिळते. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःच्या मेहनतीवर सुशांतने चित्रपटसृष्टीत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं होतं.सुशांतच्या याच स्ट्रगलबद्दल नुकतंच अभिनेता विवेक ओबेरॉयने भाष्य केलं आहे. इतकंच नव्हे तर सुशांतच्या अंत्यसंस्कारावेळी विवेक स्वतः तिथे उपस्थित होता. त्यावेळी सुशांतच्या वडिलांना पाहून त्याला काय भावना मनात दाटल्या याबद्दल विवेकने खुलासा केला आहे. इतकंच नव्हे तर आपल्या अडचणीच्या काळात आपणही सुशांतसारखं पाऊल उचलणार होतो हेदेखील विवेकने स्पष्ट केलं.

## मेधाने सांगितला प्रवास

विक्रांत मेसी आणि मेधा शंकर अभिनीत '12TH फेल' २०२३ चा सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. फक्त २० कोटी बजेट असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर तब्बल ६६.५८ कोटींची कमाई केली. ६९ व्या फिल्मफेअर पुरस्कार सोहळ्यात '12TH फेल' चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला. हा चित्रपट प्रेक्षकांसह अनेक कलाकारांच्या पसंतीस उतरला आणि त्यांनी भरभरून या चित्रपटाचं कौतुक केलं. या चित्रपटात विक्रांत मेसी याने मनोज शर्मा, तर मेधा शंकरने श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारली होती.'12TH फेल' चित्रपट २५० भारतीय चित्रपटांच्या यादीत सामील झाला आहे. अशातच चित्रपटात श्रद्धा जोशी यांची भूमिका साकारणाऱ्या मेधा शंकरला आपल्या संघर्षाच्या दिवसांची आठवण आली. तिने सांगितले की एक काळ असा होता जेव्हा तिच्या बँकेच्या खात्यात फक्त २५७ रुपये शिल्लक होते.अलीकडेच आयएमडीबीला (IMDB) दिलेल्या मुलाखतीत मेधा शंकरने तिच्या संघर्षातील दिवसांची आठवण सांगितली. ती म्हणाली, '12TH फेल' चित्रपटाचा भाग होण्यासाठी तिला खूप वेळ लागला. मेधाने २०१८ मध्ये मुंबईत अभिनेत्री म्हणून आपल्या करिअरला सुरुवात केली. २०२२ मध्ये तिने या चित्रपटासाठी कास्टिंग एजन्सीकडे पहिल्यांदा ऑडिशन दिले. नंतर ती दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा आणि त्यांच्या टीमबरोबर स्क्रीन टेस्टसाठी गेली.ऑडिशनदरम्यान मेधाला हा रोल तिच्यासाठीच आहे अस वाटलं होतं.



## हुड्डाने केले स्वत:ला कैद

भूमिका कोणतीही असो, त्या भूमिकेशी अगदी समरस होऊन काम करणाऱ्या काही मोजक्या मेहनती अभिनेत्यांच्या यादीत रणदीप हुड्डा हे नाव हमखास येतंच. आजवर रणदीपने विवध भूमिका साकारल्या आहेत. पण सध्या मात्र तो त्याच्या आगामी 'स्वातंत्र्यवीर सावरकर' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच सर्वांचं लक्ष या चित्रपटाकडे लागलं आहे. सर्वप्रथम हा चित्रपट महेश मांजरेकर दिग्दर्शित करणार होते. काही कारणास्तव महेश मांजरेकर यांनी यातून काढता पाय घेतला अन् दिग्दर्शनाची धुरा रणदीपने स्वतःच्या खांद्यावर पेलली.या चित्रपटात रणदीप हा स्वातंत्र्यवीर सावरकरांची भूमिका साकारणार असून याचं दिग्दर्शनही त्यानेच केलं आहे. गेल्यावर्षी या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता ज्याला उदंड प्रतिसाद मिळाला होता. अखेर यावर्षी मार्च महिन्यात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अशातच स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त रणदीपने ए क खास पोस्ट शेअर करत सावरकरांना मानवंदना दिली आहे.चित्रपटाच्या रेकीदरम्यान रणदीपने अंदमानच्या सेल्युलर जेलला भेट दिली होती. तेव्हाचे फोटोज रणदीपने शेअर केले आहेत. सावरकर यांना ज्या कोठडीत ठेवलं होतं त्या सेलमध्ये जाऊन रणदीप सावरकरांच्या प्रतिमेपुढे नतमस्तक झालेला आपल्याला पाहायला मिळत आहे. हे फोटोज रणदीपने त्याच्या सोशल महान पुत्र, नेता, स्वातंत्र्यसैनिक, लेखक, कवि, तत्वज्ञ अशा स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी. त्यांच्या बुद्धीचं प्रखर तेज व साहसाला घाबरून ब्रिटिशांनी त्यांना ७ बाय ११ च्या छोट्याश्या जेलमध्ये दोन काळ्यापाण्याच्या शिक्षेसाठी डांबलं.

## माधुरीचा 'हम आपके है कौन'चा खास लूक

बॉलीवूडमधील धक धक गर्ल माधुरी दीक्षित आजही तिच्या अभिनयासह नृत्य कौशल्यामुळे चर्चेत आहे. १९९४ रोजी प्रदर्शित झालेला 'हम आपके है कौन' या चित्रपटातील माधुरी दीक्षित आणि सलमान खानची जोडी लोकप्रिय ठरली होती. यात अभिनेत्री विविध प्रकारच्या मॉडर्न आणि एथिनिक लूकमध्ये दिसली होती. या चित्रपटातील गाणी आणि कथानकामुळे चित्रपट हिट झाला होता.मोठ्या कुटुंबासह मित्रपरिवारासमवेत होणाऱ्या भव्य लग्नसोहळ्याचा ट्रेंड त्याकाळी चित्रपटामुळे घराघरांत पोहोचला. चित्रपटात हिंदी सिनेसृष्टीतल्या दिग्गज कलाकारांसह मराठमोळे कलाकारही होते. रेणुका शहाणे, अनुपम खेर, रिमा लागू, अलोक नाथ, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया बेर्डे अशी स्टारकास्ट या चित्रपटाला लाभली होती.'हम आपके है कौन' चित्रपटातील 'दीदी तेरा देवर दीवाना' हे गाणं तेव्हा खूप प्रसिद्ध झालं होतं. या गाण्यामधील माधुरी दीक्षितच्या जांभळ्या रंगाच्या साडीने आणि बॅकलेस ब्लाऊजने प्रेक्षकांचं लक्ष वेधलं होतं. प्रसिद्ध डिझायनर अण्णा सिंग यांनी त्यावेळी ही साडी डिझाइन केली होती. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या वेळी तब्बल ₹१.५ दशलक्ष किंमतीची ही साडी केवळ फॅशन स्टेटमेंटच नव्हती, तर तिच्या अनोख्या बॅकलेस ब्लाउज आणि फूल स्लीव्हजसह त्याकाळी चर्चेचा विषय ठरली.तीस वर्षांनंतर पुन्हा एकदा माधुरीने 'दीदी तेरा देवर दीवाना' या गाण्यातील जांभळ्या साडीमधला लूक रिक्रिएट केला आहे. या लूकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. 'डान्स दिवाने'च्या रिॲलिटी शोसाठी माधुरीने या आउटफिटची निवड केली आहे.



# त्याने दबावात संयम दाखवला!

## मालिका विजयानंतर रोहितकडून ध्रुव जुरेलचे कौतुक

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**रांची येथे खेळल्या गेलेल्या इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या सामन्यात भारताने ५ विकेट्सने विजय मिळवला. या विजयासह संघाने मालिकेत ३-१ अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. भारताच्या या विजयानंतर कर्णधार रोहित शर्मा खूप आनंदी दिसत होता. विजयानंतर त्याने यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेलसह सर्व युवा खेळाडूंचे कौतुक केले.**



रांचीमधील विजयानंतर भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा म्हणाला, “ही खूप कठीण मालिका होती. चार कसोटी सामन्यांनंतर शेवटी या स्थितीत येणे आमच्यासाठी चांगले होते. आमच्यासमोर अनेक आव्हाने आली, पण आम्ही त्यांना चोख प्रत्युत्तर दिले. या खेळाडूंना इथेच राहायचे आहे. देशांतर्गत क्रिकेट आणि स्थानिक क्लबमधून येथे येणे हे मोठे आव्हान आहे,
पण मला त्यांच्याकडून मिळालेला प्रतिसाद कौतुकास्पद आहे. त्यांना हवे ते वातावरण आम्ही त्यांना दिले. त्यांना काय करायचे आहे याबद्दल ते स्पष्ट आहेत.”रोहित शर्मा पुढे ध्रुव जुरेलचे कौतुक करताना म्हणाला, “जुरेलने फलंदाजीमध्ये संयम दाखवला आणि चौफेर फटके मारले. पहिल्या डावातील त्याच्या ९० धावा अतिशय महत्त्वाच्या होत्या. दुसऱ्या डावातही त्याची आणि गिलची भागीदारी महत्त्वाची होती. त्याने शुबमन गिलसह दबाव चांगला हाताळला.” ध्रुव जुरेल आणि शुबमन गिल यांनी नााबाद ७२ धावांची भागीदारी साकारत भारतीय संघाला सामना जिंकवून दिला. शुबमन ५२ धावांवर नाबाद राहिला.युवा यष्टिरक्षक फलंदाज ध्रुव जुरेलने रांची कसोटीत भारतासाठी अप्रतिम कामगिरी केली. पहिल्या डावात भारताचा डाव सावरताना त्याने १४९ चेंडूत ६ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने संघासाठी ९० धावांची खेळी केली. दुसऱ्या डावातही त्याने आपला उत्कृष्ट फॉर्म कायम ठेवला.
लक्ष्याचा पाठलाग करताना त्याने ७७ चेंडूत २ चौकारांच्या मदतीने ३९ धावा केल्या आणि तो शेवटपर्यंत नाबाद राहिला. शुभमन गिलसोबतची त्याची भागीदारी महत्त्वाची होती, ज्यामुळे सामना भारतीय संघाच्या बाजूला झुकला.भारताच्या पहिल्या डावात 177 धावांवरच 7 विकेट्स पडल्या होत्या. ध्रुव जुरेलचा हा दुसराच सामना होता. शिवाय त्याला टेलेंडर्ससोबत फलंदाजी करावी लागणार होती. जुरेलने जबाबदारीने फलंदाजी केली.
तो केवळ दुसरा सामना खेळतोय, असे कोणलाही जाणवले नाही. टीम इंडियाकडून एका खेळाडूला मोठी खेळी करणे गरजेचे होते. अशा वेळी त्याने 149 चेंडूमध्ये 90 धावांची खेळी केली. यामध्ये 6 षटकार आणि 4 चौकारांचा समावेश होता. इंग्लंडने पहिल्या डावात 353 धावा केल्या. याच्या प्रत्युत्तरात भारताने सुरुवात करताच टॉप ऑर्डर फ्लॉप ठरला. भारताची अवस्था 177 वर 7 बाद अशी झाली होती. त्यामुळे टीम इंडिया चांगलीच अडचणीत आली होती. 200 धावा बनवणे ही कठीण वाटत असताना ध्रुव जुरेल आणि कुलदीप यादवने भागिदारी रचली. दोघांमध्ये 8 व्या विकेटसाठी 76 धावांची भागिदारी झाली. याच भागिदारीमुळे संपूर्ण बाजी पलटली. कुलदीपने 131 चेंडूंचा सामना करत 28 धावा केल्या. तर जुरेलने 90 धावांची खेळी केली.

### जैस्वालकडून दमदार सुरुवात

» इंग्लंडने रांची कसोटीत टीम इंडियापुढे 192 धावांचे आव्हान ठेवले होते. याच्या प्रत्युत्तरात भारताच्या सलामीवीरांनी दमदार सुरुवात केली. रोहित आणि यशस्वीने सुरुवातीला फटकेबाजी केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी 84 धावांची भागिदारी रचली. रोहितने 55 धावा केल्या. तर यशस्वी जैस्वालने 37 धावांचे योगदान दिले. इंग्लंडच्या 192 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना टीम इंडियाचा मध्यक्रम पूर्णपणे फ्लॉप ठरला. 120 धावांवर भारतीय संघाने 5 विकेट्स गमावल्या. यानंतर फलंदाजीसाठी आलेल्या ध्रुव जुरेलने शुभमन गिलला साथ दिली. दोघांच्या भागिदारीने टीम इंडियाचा मार्ग सुखकर केला. दोघे भारताला विजय मिळवून देऊनच तंबूत परतले. दोघांनी सहाव्या विकेटसाठी 72 धावांची भागिदारी रचली. गिलने नाबाद 52 धावा केल्या तर जुरेलने 39 धावांचे योगदान दिले. रांची कसोटीत अश्विन-जाडेजाच्या फिरकीने कमला दाखवली. इंग्लंडच्या पहिल्या डावात रवींद्र जाडेजाने 4 तर अश्विनने 1 विकेट् पटकावली. तर इंग्लंडच्या दुसऱ्या डावात सर्व विकेट्स फिरकीपटूंनीच पटकावल्या. दुसऱ्या डावात रविचंद्रन अश्विनने 5 विकेट्स पटकावल्या. कुलदीप यादवने 4 तर रवींद्र जाडेजाने 1 विकेट पटकावली होती.

# मध्य प्रदेशची सलग तिसऱ्यांदा उपांत्य फेरीत धडक!

## कर्नाटकला 268 धावांची गरज, तर मुंबईकडे 415 धावांची आघाडी

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रणजी करंडक २०२३-२४ स्पर्धेतील तिसरा उपांत्यपूर्व फेरीच्या सामना मध्य प्रदेश आणि आंध्र प्रदेश यांच्यात सोमवारी पार पडला. या रोमांचक मध्य प्रदेशने आंध्रचा ४ धावांनी पराभव करत सलग तिसऱ्यांदा रणजी करंडक स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. १७० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना आंध्रचा संघ एकेकाळी मजबूत स्थितीत होता. दिवसाचा खेळ सुरू झाला तेव्हा त्यांची धावसंख्या ९५/४ होती. त्यावेळी क्रीजवर अनुभवी हनुमा विहारी होता. यानंतर अनुभव अग्रवालने शानदार गोलंदाजी करत सामना आपल्या बाजूला झुकवला.**





पहिल्या डावात तीन बळी घेणाऱ्या या वेगवान गोलंदाजाने सोमवारी सकाळी होळकर स्टेडियमवर ५२ धावांत ६ बळी घेत आंध्रच्या आशा धुळीस मिळवल्या. स्टंप-टू-स्टंप गोलंदाजी करताना अनुभवने पहिल्यांदा करण शिंदेला बाद केले. यानंतर त्याने अर्धशतक झळकावणाऱ्या विहारीची महत्त्वपूर्ण विकेट घेतली. या सामन्यात मध्य प्रदेशने पहिल्या डावात २३४ धावा केल्या होत्या, प्रत्युत्तरात आंध्र प्रदेशने १७२ धावा केल्या. त्यानंतर दुसऱ्या डावात १०७ धावा केल्या आणि आंध्राला १७० धावांचे लक्ष्य दिले होते, प्रत्युत्तरात संघ १६५ धावांवर गारद झाला.मध्य प्रदेशने विहारीची विकेट घेण्यासाठी एक जाळे टाकले होते, ज्यात विहारी अडकला.
अनुभवच्या षटकाच्या आधी, कुलवंत खेजरोलियाने बाउन्सर आणि शॉर्ट चेंडूने विहारीला त्रास दिला. मध्य प्रदेशचे मुख्य प्रशिक्षक चंद्रकांत पंडित यांच्या म्हणण्यानुसार, ‘विहारीचे लक्ष वळवण्यासाठी’ हे केले गेले. अशा प्रकारे मध्य प्रदेशन विहारीला आपल्या जाळ्यात अडकवले. हनुमा विहारी पॅव्हेलियनमध्ये परतल्यानंतर आंध्रने झटपट विकेट गमावल्या. अनुभव आतापर्यंत या हंगामात सर्वश्रेष्ठ प्रदर्शन करताना २४ विकेट्स घेतल्या आहेत.

### मुंबईकडे 415 धावांची आघाडी

» दुसऱ्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात मुंबई आणि बडोदा आमनेसामने आहेत. यामध्ये हार्दिक तामोरेचे शतक (११४) आणि पृथ्वी शॉच्या अर्धशतकाच्या (८७) बळावर मुंबईने दुसऱ्या डावात ९ गडी गमावून ३७९ धावा केल्या आहेत. त्यामुळे मुंबईची एकूण आघाडी ४१५ धावांची झाली आहे. सध्या तनुष कोटियन (३२) आणि तुषार देशपांडे (२३) क्रीजवर आहेत. हा सामना शेवटच्या दिवशी अनिर्णित राहिल्यास मुंबई उपांत्य फेरीत प्रवेश करेल.पहिल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात कर्नाटकने विजयासाठी ३७१ धावांच्या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना १ बाद १०३ धावा केल्या आहेत.सध्या मयंक अग्रवाल (६१) आणि अनीस केव्ही (१) क्रीजवर आहेत. कर्नाटककडून आर समर्थ (४०) हा एकमेव फलंदाज बाद झाला.